## पुणे विद्यापीठ (UNIVERSITY OF PUNE)
## बी. सी. यु. डी. संशोधन प्रकल्प (BCUD- Research Project)

# भारतातील छोटया राज्यांची पुनर्रचना : तेलंगणा आणि विदर्भाच्या विशेष संदर्भात- एक विश्लेषणात्मक अभ्यास.

**(Formation of small states in India : Special reference to Telegana and Vidharbha – An analytical Study)**

## गोषवारा (An Abstract)

**मुख्य संशोधक**
**डॉ. बाळ अनंत कांबळे**
प्राचार्य व राज्यशास्त्र विभागप्रमुख
रयत शिक्षण संस्थेचे,
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जिल्हा- अहमदनगर

(Ref : OSD/BCUD (University of Pune)/230/122 dated 14/05/2012)

# <u>प्रकरण - १</u>
# प्रस्तावना, अभ्यास व संशोधन पद्धती

**अ) प्रस्तावना :-**

गेल्या काही वर्षात, सांस्कृतिक विविधता, सामाजिक-आर्थिक मागासलेपण, प्रादेशिक अस्मिता या कारणांमुळे छोटया घटक राज्यांची मागणी पुढे येत आहे. उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती यांनी छोटया राज्यांच्या निर्मितीला पाठिंबा दिला भारतातील विविध राजकीय पक्षांचा त्याला पाठिंबा आहे. मात्र छोटया राज्यांच्या निर्मितीमुळे भारताच्या संघराज्यीय रचनेवर विपरीत परीणाम होऊ शकतो. कारण छोटी राज्ये केंद्र सरकारवर अत्याधिक प्रमाणात परावलंबी राहू शकतात. नैसर्गिक संसाधने, औद्योगिक विकास, जलसंधारणयुक्त कृषीक्षेत्र अशा घटकांच्या आधारे काही छोटी राज्ये स्वायत्तपणे राहू शकतात. मात्र छोटया राज्यांच्या बाबतीत असेही दिसते की, भारतातील बहूपक्षीय राजकीय स्पर्धेमुळे छोटया राज्यांमध्ये अस्थिरतेचा प्रश्न उभा राहिलेला दिसतो. सांस्कृतिक बहुविविधता हे वैशिष्टय असलेल्या आपल्या देशात केवळ विकासाच्या मुद्याच्या आधारे छोटया राज्यांची मागणी पुढे रेटणे घातक ठरू शकते. 'प्रादेशिक अस्मितेची अतिरिक्त स्वरूपातील जोपासना' हे या घटकामध्ये छोटया राज्यांच्या मागणीचे मूळ आहे व या मागणीमागे प्रादेशिक राजकीय पक्षांचे स्वार्थी राजकारण दडलेले आहे.

छोटी राज्ये केंद्रशासनावर अवलंबून राहतात. या आधारे, केंद्रामधील सत्ताधारी पक्षदेखील या मुद्यांसंदर्भात 'संधिसाधू' भूमिका घेताना दिसते. त्यामुळे या मुद्यांवर केंद्र व घटक राज्यांमध्ये सौदेबाजीचे राजकारण सुरू असल्याचे दिसते. त्यामुळेच या सर्व बाबींचे 'भारतीय संघराज्यीय व्यवस्थेवर' विपरीत परीणाम दिर्घकालीन स्वरूपात होऊ शकतात.

**१) संशोधन समस्येचे मूळ :-**

भारतीय राज्यघटनेनुसार 'भारत हा राज्यांचा संघ आहे'. त्यामुळेच अमेरीकेच्या धर्तीवर भारतातील घटकराज्ये स्वायत्त असू शकत नाहीत. मात्र भारतातील घटकराज्यांची

पुर्नरचना बयाचदा राजकीय कारणांच्या आधारे होते. या बाबींचा भारतीय संघराज्यीय व्यवस्थेवर विपरीत परीणाम होतो. या परीणामांचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

**२) आंतरविद्याशाखीय संदर्भ/महत्व :-**

१९५३ मध्ये न्यायमूर्ती फाजल अली यांच्या नेतृत्वाखाली राज्य पुर्नरचना आयोग नेमण्यात आला. 'एक भाषा – एक राज्य' या तत्वाचा विचार काही राज्यांची पुर्नरचना करताना केला. मात्र या आधारे झालेल्या राज्य पुर्नरचनेने सर्व प्रश्न सुटले नाहीत, सीमाप्रश्न निर्माण झाले. आपण अद्यापपर्यंत हे प्रश्न सोडवू शकलेलो नाही. याच संदर्भातील आर्थिक व सामाजिक समस्यांची उत्तरेही आपण शोधू शकलेलो नाही. त्यामुळेच या वस्तुस्थितीचे अध्ययन प्रस्तूत संशोधन प्रकल्पाद्वारे करणे महत्वाचे वाटले.

**३) संशोधन विषयातील पुर्वाभ्यास, आंतरराष्ट्रीय संदर्भ :-**

अमेरिकेमध्ये संघराज्य व्यवस्था आहे. अमेरिकेमधील घटकराज्यांची निर्मिती राजकारणाच्या नव्हे तर विकासाच्या मुद्यांच्या आधारे झालेली आहे. त्यामुळेच अमेरीकेच्या राजकीय व्यवस्थेत, मध्यवर्ती शासन व घटकराज्यांचे संबंध सुरळीत स्वरूपाचे आहेत. याउलट भारतीय राजकीय व्यवस्थेत नव्या घटकराज्यांच्या निर्मितीमागे राजकीय स्वरूपाची कारणे असल्याचे दिसून येते.

**४) राष्ट्रीय संदर्भ :-**

भारतातील 'केंद्र-राज्य संबंध' या घटकांच्या संदर्भामध्ये छोटया राज्यांच्या निर्मितीचा प्रश्न समजून घेणे गरजेचे आहे. बदलत्या राजकीय परीस्थितीमध्ये छोटया राज्यांच्या निर्मितीचा प्रश्न समजून घेणे गरजेचे आहे. छोटया राज्यांची निर्मिती राजकीय अस्थिरतेमध्ये परावर्तीत होऊ शकते.

**ब) अभ्यास व संशोधन पद्धती**

**१) अभ्यासाचे महत्व :-**

भारतीय राज्यघटना केंद्राकर्षी संघराज्य व्यवस्थेच्या उदयाला आधारभूत ठरली आहे. मोठया घटकराज्यांच्या तुलनेत छोटी घटकराज्ये संसदीय राजकारणावर व्यवस्थेची प्रभावक्षमता सदर अभ्यासाद्वारे तपासण्याची गरज भासली. राजकीय सत्तेच्या

विकेंद्रीकरणासाठी छोटया राज्याच्या निर्मितीची गरज आहे काय? ही बाबही सदर अभ्यासाद्वारे तपासण्याचा प्रयत्न केला आहे. आंध्रप्रदेश मधून तेलंगणाची निर्मिती व महाराष्ट्रातून स्वतंत्र विदर्भ राज्यांची मागणी या मुद्यांचा अभ्यास सदर संशोधन प्रकल्पात केला आहे.

**२) अभ्यासाची उद्दिष्टे :-**

१) राज्यांच्या पुनर्रचनेमागील कारणांचा शोध घेणे.

२) राज्य पुनर्रचनेचा भारतीय संघराज्य व्यवस्थेवरील परीणामांचा अभ्यास करणे

३) राज्य पुनर्रचना व आर्थिक विकास यांचा सहसंबंध अभ्यासणे.

४) बदलत्या राजकीय परीप्रेक्ष्यामध्ये छोटया राज्यांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

५) 'राजकीय अस्थिरता' या घटकाचा छोटया राज्यावरील होणाऱ्या परीणामांचा अभ्यास करणे.

६) राजकीय सत्ता मिळविण्याची प्रक्रिया व छोटया राज्यांची निर्मिती यांचा सहसंबंध अभ्यासणे.

**३) संशोधन पद्धती :-**

तथ्य संकलनासाठी निरीक्षण पद्धती व मुलाखत तंत्राचा अवलंब कला आहे. महाराष्ट्र व आंध्रप्रदेश या घटकराज्यांमधील परीस्थितीचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. संशोधनाची संख्यात्मक व गुणात्मक पद्धतीचा वापर केला आहे. तथ्य संकलनासाठी खालील स्त्रोत वापरले आहेत.

**अ) प्राथमिक स्त्रोत :-**

१. सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते यांच्या मुलाखती

२. प्रत्यक्ष स्थळी भेट व चर्चातंत्राचा अवलंब

**ब) दुय्यम स्त्रोत :-**

१. केंद्र - राज्य संबंधासदर्भात अहवाल तेलंगणा विषयावरील न्या. श्रीकृष्ण समितीचा अहवाल.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची "भाषिक आधारावरील राज्ये" या विषयावरील व्याख्याने व पुस्तके.

३. संशोधनविषयाशी निगडीत ग्रंथ व अभ्यास पत्रिका

४. या संबंधित विविध अहवाल व कागदपत्रे

५. तेलंगणा, विदर्भ व छोटी राज्ये या विषयांशी निगडीत संकेतस्थळे (वेबसाईटस्)

## प्रकरण २
## भारतीय संघराज्याची सैध्दांतिक चौकट

या प्रकरणात भारताने संघराज्य शासनपध्दतीचा स्वीकार कोणत्या कारणामुळे केला आहे या संबंधात चर्चा केली आहे. भारतीय संघराज्याचे स्वरूप, भाषावार प्रांतरचना, राज्य पुनर्रचना आयोग, छोटया राज्याच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका आणि भाषिक प्रांतरचनेच्या काही मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. ३१ जुलै २०१३ रोजी तेलंगणा वेगळे राज्य निर्माण करण्याचा निर्णय झाल्यानंतर अखंड आंध्रासाठी आंध्रप्रदेशातील संघर्ष शिगेला पोहोचला. त्यावेळी देशातील इतर काही राज्यातून सामाजिक, आर्थिक, मागासलेपणा, सांस्कृतिक वेगळेपणा आणि राजकीय उदासिनता या कारणाने सद्या वेगळया राज्यांच्या मागण्यांनी जोर धरला आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाकडे आलेले प्रस्ताव आणि अधून-मधून होणारी आंदोलने याचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

## प्रकरण -३
## स्वतंत्र तेलंगणा राज्याची चळवळ

या प्रकरणात तेलंगणाच्या निर्मितीसाठी झालेली वेगवेगळी आंदोलने व चळवळी याचा वृत्तांत दिला आहे. तेलंगणा प्रजा समिती, तेलंगणा राष्ट्र समिती, श्रीकृष्ण समितीचा अहवाल आणि २०१३ या वर्षातील तेलंगणा चळवळ व आंदोलने याची माहिती दिली आहे. आंध्र प्रदेशचे विभाजन झाल्यांनतरची प्रतिक्रियाही याच प्रकरणात दिली आहे.

## प्रकरण – ४
## स्वतंत्र विदर्भ राज्याची चळवळ

या प्रकरणात विदर्भातील नैसर्गिक साधनसंपत्ती, संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि विदर्भ अकोला करार, नागपूर करार, राज्यपुनर्रचना आयोग आणि विदर्भ,प्रादेशिक असमतोल व वैधानिक विकास मंडळाची मागणी, युतीच्या काळातील स्वतंत्र विदर्भाबाबत काँग्रेस पक्षाचे आंदोलन, रालोआ सरकार आणि स्वतंत्र विदर्भ राज्याचा मुददा आणि प्रामुख्याने तेलंगणाच्या निर्मितीची घोषणा झाल्यानंतर स्वतंत्र विदर्भासाठी झालेली आंदोलने व चळवळी येथे दिल्या आहेत.

## प्रकरण ५
## निष्कर्ष

३१ जुलै २०१३ रोजी युपीए सरकारने आंध्राचे विभाजन करून स्वतंत्र तेलंगणा राज्याची घोषणा केल्यामुळे अनेक मोठया राज्यातून छोटया राज्यांच्या मागण्या पुढे आलेल्या दिसल्या. या पार्श्वभूमीवर छोटया राज्यांचे काय पेच असतील याचे विवेचन या अभ्यासात केले आहे. छोटया राज्यांच्या मागणीचे समर्थन करतांना छोटी राज्ये लोकशाही मजबूत व प्रभावशील बनवितात. अशा छोटया राज्यात सत्तेचे विकेंद्रीकरण सहज जनतेपर्यंत पोहोचते. जनतेचा राजकीय सहभाग वाढतो. सत्तेचा लाभ लवकर मिळतो. आर्थिक विकासात गती मिळते तसेच अशा राज्यांत जनतेचे राजकीय प्रशिक्षण व सामाजिकरण करणे सुलभ जाते, महत्त्वाचे म्हणजे प्रशासन व्यवस्थेत सुलभता वाढते असे युक्तीवाद केले जातात. पण हे युक्तीवाद योग्य आहेत का? याचा चौकस बाजुंनी अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की अशा छोटया राज्यांमुळे भारतीय संघराज्यात बहुपदरी पेच निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. पण आपल्यावर सतत अन्याय होत असल्याचे तसेच आपल्या सांस्कृतिक, भाषिक या प्रादेशिक अस्मितांची पायमल्ली होत असल्याची तीव्र भावना सतत विकासातील काही भुभागातील वाढत चाललेल्या असमतोलपणा यामुळे छोटया राज्यांच्या मागण्या पुढे येत असताना दिसतात. उत्तरप्रदेश एक मोठा भुभाग आणि लोकसंख्येने अवाढव्य असलेले राज्य आहे. त्यामुळे त्याचे नीट व्यवस्थापन करणे,

प्रशासकीय योजना कार्यक्षमतेने राबविणे हे दिवसेंदिवस अडचणीचे होत आहे. म्हणून मुख्यमंत्री मायावतीने उत्तर प्रदेशाचे विभाजन करून स्वतंत्र पश्चिम हरित प्रदेश (२२ जिल्हे), बुंदेलखेड (११ जिल्हे), अवधप्रदेश (१४ प्रदेश) पुर्वांचल (३० जिल्हे) अशी राज्य निर्माण करण्याचा विधानसभेत ठराव गेल्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर केला होता. मायावतीने निवडणुकीच्या तोंडावर जनाधार मिळविण्यासाठी राजकारणाचा भाग म्हणून असे केलेले असले तरी त्यांना असे वाटते की, ज्या भूभागातून स्वतंत्र राज्याच्या मागण्या येतात, त्यांचा आपणाला पाठिंबा मिळेल आणि बसपाची ताकत वाढेल. पण तसे झाले नाही तरीही मायावती उत्तरप्रदेशचे विभाजन करून चार राज्यांची मागणी आजही करीत आहे. संख्यात्मक दृष्टीने अशा मोठया राज्यांचे चार राज्यापेक्षा दोन राज्य करणे हे प्रशासनाच्या दृष्टीने योग्य राहील कारण छोटी राज्ये अनेक कारणांनी हानीकारक ठरत आहेत. जेवढी छोटी राज्ये वाढतील तेवढी आंतरराज्यीय तंटयात वाढ होईल आणि अनेक नवनवीन प्रश्न व्यवस्थेसमोर येतील असे या विषयांचा अभ्यास करतांना वाटते.

१) मागासलेपणाच्या आधारावर नवीन राज्य निर्माण करण्याचा युक्तीवाद वरकरणी तात्काळ पटणारा आणि विकासासाठी भुरळ पाडणारा असला तरी ते अनेक कारणांनी अडचणीचा ठरू शकतो. संपूर्ण देशातील अनेक राज्यातील बहुदा प्रदेश हे असेच मागासलेले आहेत. त्यामुळे प्रत्येक मागास भागाचे राज्य निर्माण करणे हे राजकीय व्यवस्थेसमोरचा पेच निर्माण होऊ शकतो. सामाजिक, सांस्कृतिक विभिन्नता असणाऱ्या आपल्या देशात अशी छोटी राज्ये निर्माण करून त्यांची पुनर्रचना करणे, सीमा निश्चित करणे हे गुंतागुंतीचे ठरू शकते. तसेच सांस्कृतिक, भाषिक समूहांना असे अलग-अलग करण्यामुळे त्यांची स्वतंत्र ओळख, अस्मिता जोपासली-पोसली जाऊन हा वेगळा प्रश्न निर्माण होऊ शकतो. भारत हा विविधतेत एकता असणारा देश आहे. अशी बहुविविधता स्वतंत्र राज्यात रूपांतरित केली तर राज्यांत विभिन्न कारणांनी संघर्ष निर्माण होऊ शकतो. तसेच ते असहिष्णूवादी बनतात जसे उत्तरपूर्वेकडच्या राज्यात अशी परस्परांविषयी असहिष्णूता आहे. त्यामुळे अशी छोटी राज्ये निर्माण करून व्यवस्थेत पेचाचा गुंता करण्यापेक्षा लोकशाही मुल्ये, बहुविविधता, मागासभागांचा विकास यांना प्राधान्य देणे

गरजेचे आहे. केवळ मागास भागांचा विकास करावयाचा म्हणून स्वतंत्र राज्याचा पर्याय हा मार्ग चुकीचा आहे. मग ओरिसा, झारखंड आणि उत्तरपूर्वेकडची राज्ये मागास आहेत हे आज आपणास कळते. त्यासाठी विकासाबाबतीत नियोजनपूर्वक कार्यक्षम विकासांच्या योजना त्याही जलद गतीने करणे आवश्यक आहे. निधीची लवकर पूर्तता, तसेच नेत्यांची जबर इच्छाशक्ती असणे आवश्यक आहे. नवीन राज्ये निर्माण केले तरी तेच करावे लागणार आहे. उलट अशी नवीन राज्य निर्माण करण्यासाठी प्रशासकीय संरचना उभारण्यासाठी आर्थिक बोजा ज्या राज्यावर आणि केंद्र सरकारवर पडतो असे या अभ्यासावरून लक्षात आले आहे.

२) छोटी राज्य निर्माण केल्यामुळे लोकांच्या स्थितीत सुधारणा होणार नाही अथवा विकासही होणार नाही. मुळात विकास करण्यासाठी छोटया राज्याची आवश्यकता नाही तर नेत्यांच्या चांगल्या मानसिकतेची आवश्यकता आहे. तसेच शासकीय अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन, निवडणुकीत योग्य उमेदवाराला निवडून देणे, विरोधी पक्षाची जागरूकता, धर्मनिरपेक्षवादी राजकारण, आणि माध्यमांची निःपक्षपाती भूमिका यावर विकास अवलंबून आहे. मोठी राज्ये असताना सुध्दा बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी इच्छाशक्ती आणि प्रभावी नियोजनाने विकास करता येतो हे दाखवून दिलेले आहे. अशी छोटी राज्ये निर्माण केल्याने नेत्यांचे राजकीय स्वार्थ मात्र पूर्ण होवू शकतात. राज्यपाल, मंत्री या पदांची संख्या वाढते, प्रशासकीय यंत्रणा उभी राहते. कर्मचाऱ्यांची संख्या वाढते. यावरच बहुदा पैसा खर्च होईल. तसेच प्रशासकीय अधिकारी आणि राज्यकर्त्यांचे घोटाळे सतत वाढत राहतील. त्यासाठी अशा राज्यांना राज्याचा कारभार चालविण्यासाठी केंद्राच्या आर्थिक मदतीवर अवलंबून राहावे लागेल. त्यामुळे विकास हा दूर होत जाईल राज्यांचे विभाजन करणे ही राजकीय चाल आहे. अशी छोटी राज्ये ही स्वार्थी राजघराण्यांची बटीक बनतात. ते संस्थानिक बनू शकतात. अगोदरच भारतीय राजकारणात स्थानिक स्तरांपासून वरपर्यंत राजकारणात घराणेशाही आहे. अशी छोटी राज्ये घराणेशाहीला बळकटी देवू शकतात.

३)	विदर्भाच्या विकासाच्या अनुशेष सतत वाढत राहीला. याची कोणीतरी जबाबदारी घ्यायला हवी. विदर्भाच्या मागसलेपणाला शासन आणि विशेषतः विदर्भातील नेते जबाबदार आहेत असे वाटते. विदर्भ हा पूर्वापार मागास आहे. नागपूर कराराद्वारे विदर्भाच्या विकासाच्या अटी मान्य करून महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात आले. १९५६ ला संविधानात संशोधन करून मागास भुभागांच्या विकासासाठी विशेष निधी देण्याची तरतूद अनुच्छेद ३७१ मध्ये करण्यात आली. त्यानुसार विदर्भात वैधानिक विकास महामंडळ तेव्हाच स्थापन करायला पाहिजे होते ते १९९४ ला स्थापन केले गेले. तसेच महाराष्ट्र राज्यांच्या निर्मितीनंतर महाराष्ट्राच्या विधिमंडळात 'स्टेटमेंट ऑफ गव्हर्नमेंट पॉलिसी' म्हणजे विदर्भाचा विकास करण्याचा वचननामा सादर करण्यात आला. त्याचेही पालन झालेले नाही. एक बाब मात्र निश्चित की दांडेकर सत्यशोधक समितीचा अहवाल १९८२, अनुशेष निर्देशांक समितीचा अहवाल (२०००), जलसंपदा प्राधिकरणाचा अहवाल (२००९-१०) यावरून हे स्पष्ट होते की, विदर्भाचा अनुशेष व मागासलेपणा कितीतरी पटीने वाढलेला आहे. मुख्य मुददा संविधानात्मक विकास योजनेची सुरूवात जर तेव्हाच झाली असती तर कदाचित देशातील विभिन्न राज्यांतून प्रादेशिक विकासाबाबतचा जनतेचा प्रक्षोभ हा कमी झाला असता. पण प्रत्यक्षात शासनाच्या विकासांच्या योजना उशीरा सुरू झाल्या. त्याची अंमलबजावणी होण्यास वेळ लागला.तोपर्यंत मागास भागांचा अनुशेष पटीने वाढत राहिला. विदर्भासाठी पंतप्रधानांनी विकासाचे पॅकेज दिले पण ते वेळेवर मिळाले नाही. त्याची नियोजन पूर्वक अंमलबजावणी न होणे, प्रशासकीय अधिकाऱ्यांचा वाढता भ्रष्टाचार तसेच विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या योजना पक्षीय, स्वार्थी राजकारणांमुळे कोलमडल्या आहेत.

विदर्भातील नेते विदर्भाच्या प्रादेशिक असमतोलाचे खापर पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांवर फोडतात आणि बाजूला होतात. मात्र विदर्भाचा विकासाचा असमतोल दूर व्हावा आणि अनुशेष दूर करण्यासाठी निधी मिळविण्यसाठी विदर्भाचे नेत्यांनी एकत्र येवून उपोषण केले नाही किंवा राजीनामे दिलेले नाहीत. तर स्वार्थीपणाने आपापली राजकीय पोळी भाजून स्वार्थी राजकारण केलेले आहे. कॉंग्रेसच्या नेत्यांनी तर हायकमांडचा आदेश पाळण्यातच

आयुष्य घालविले. विकासाच्या आधारावर स्वतंत्र विदर्भाचे राज्य करून विदर्भाचे दुष्टचक्र कमी होणार नाही तर ते वाढेल त्यासाठी राजकारण्यांनी महत्त्वाकांक्षी विकासयोजना तातडीने हाती घेवून अर्धवट राहिलेली कामे तीव्र गतीने करणे गरजेचे आहे. विदर्भाच्या निधीबाबत केंद्र-राज्यसरकारवर दबाव आणून निधी प्राप्त करावा. तसेच पळवाला जाणारा निधी परत आणावा यासाठी विदर्भवादी नेत्यांनी प्रयत्न करावा तरच विदर्भाचा विकास होईल. स्वतंत्र राज्य केले तरी माणसे तिच राहतील. नेत्यांच्या प्रवृत्त्या त्याच राहतील. मग विकास कसा होणार यासाठी विदर्भवादयांच्या नेत्यांच्या वृत्तीत बदल झालेला दिसला नाही.

४) छोटया राज्यांच्या कारभारातील स्थिरतेचा आहे. १९९० नंतर वरचेवर राष्ट्रीय पक्षांचा प्रभाव कमी होत गेला आणि प्रत्येक राज्यात स्थानिक पक्षांचा प्रभाव वाढत गेला. अर्थात राष्ट्रीय पक्षांचा ऱ्हास, प्रादेशिक पक्षांचे वाढते वर्चस्व, पक्षांतर्गत गटबाजी, पक्षात आयाराम गयारामचे प्रमाण वाढले. या कारणांमुळे राष्ट्रीय आणि राज्यकारणात आघाडयांची सरकारे आली. आघाडी सरकारच्या अनेक मर्यादा आहेत. त्यामध्ये राहून विकासाची कामे करणे मोठे अवघड आहे. कारण प्रत्येक धोरणे वा निर्णय घेतांना संवादाच्या मार्गाने घेणे तसेच त्यावरचे मतभेद लक्षात घेता धोरणे जलदगतीने घेतले जात नाहीत. त्यामुळे विकास कामाला गती मिळत नाही. जर आघाडी बिघडली तर मग राजकीय अस्थिरता निर्माण होते. ज्या विकासासाठी छोटी राज्ये निर्माण झाली ती राजकीय अस्थिरतेच्या कचाटयात सापडल्याचे दिसतात. खऱ्या अर्थाने राज्याच्या विकासासाठी स्थिरता महत्त्वाची असते. पण गोवा, झारखंड, उत्तरपूर्वेकडील राज्ये राजकीय अस्थिरतेने ग्रासलेली आहेत. गोवा राज्यात सुरूवातीला १९६३ ते १९७६ मध्ये गोव्याचे राजकारण महाराष्ट्रवादी गोमांतक पक्ष व युनायटेड गोवन्स पार्टी या दोन स्थानिक पक्षांभोवती फिरत होते. याकाळात भाऊसाहेब बांदोडकर व शशीकला काकोडकर या दोन व्यक्तींनी मुख्यमंत्री पद अलटून पालटून संभाळले. कोणत्यातरी एका पक्षाला स्पष्ट बहुमत असायचे आणि सत्ता एका पक्षाची असायची त्यामुळे गोवा राजकीयदृष्टया स्थिर होता. १९९० नंतर गोव्याच्या राजकारणात काँग्रेस, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय कम्युनिष्ठपक्ष, मार्क्सवादी कम्युनिष्ठ पक्ष, महाराष्ट्रवादी गोमांतक पक्ष, नवमहाराष्ट्रवादी डेमॉक्रेटीक पार्टी,

तृणमुल काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रीय समाजवादी पक्ष, लोकजनशक्ती पार्टीमध्ये सत्तेसाठी पक्षीय स्पर्धा निर्माण झाली आहे. भाजपा व काँग्रेसने जास्त जागा जिंकल्या. त्यामानाने प्रादेशिक पक्षांने कमी जागा जिंकल्या आहेत. या पक्षीय व्यवस्थेमुळे तसेच गोव्याच्या राजकारणात आयाराम गयारामचे प्रमाण सतत चालू असते. त्यामुळे १९९० ते २००५ पर्यंत या पंधरा वर्षाच्या कार्यकाळात १४ वेळा सत्तांतर झाले आहे. असेच झारखंड राज्याचे आहे. झारखंडमध्ये आतापर्यंत (९ वर्षात) सहावेळा मुख्यमंत्री बदलेले आहेत. आघाडी सरकारमधील गटा-तटांच्या, हितसंबंधाच्या राजकारणामुळे राजकीय अस्थिरता निर्माण होत असते तसेच मणीपूर, नागालँड, मिझोराम या छोटया राज्यात सारखी अस्थिरता निर्माण झालेली आहे. या छोटया राज्यांची पार्श्वभूमी पाहता सध्या घोषित केलेल्या तेलंगणा राज्यात कदाचित चंद्रशेखर राव तेलंगणा राष्ट्र समितीला काँग्रेसमध्ये विलिन करून येणाऱ्या निवडणूकीत मुख्यमंत्री होवू शकतात. त्यामुळे तेदेपाला, वायएसआर काँग्रेसला धक्का बसू शकतो. पण भविष्यात सत्तेसाठी स्पर्धा, तेदेपा, काँग्रेस, वायएसआर काँग्रेस मध्ये होईल. आघाडी सरकारे येतील आणि तेच पाढे मोजत बसावे लागेल. असेच विदर्भाचेही होईल. विदर्भात काँग्रेस, भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्राबल्य आहे. विदर्भ राज्य निर्माण झाले तर या पक्षांत सत्तेसाठी स्पर्धा होईल. विदर्भातील पक्षांची बला-बलांची स्थिती पाहिल्यास २००४ च्या निवडणूकीत काँग्रेस आघाडीला ३२ जागा तर युतीला २४ जागा मिळाल्या. २००९ च्या विधानसभा निवडणूकीत काँग्रेस आघाडीला २८ तर युतीला २७ जागा मिळाल्या. यावरून सत्तेसाठी काटयाची टक्कर होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे स्वतंत्र विदर्भ राज्य झाले तरी तेथेही राजकीय अस्थिरता निर्माण होवू शकते. त्यामुळे प्रशासकीय सुलभतेसाठी छोटी राज्ये आवश्यक असतात. पण विकासासाठी छोटी राज्ये आवश्यक आहेत हे तितकेसे सत्य नाही. त्याला अनेक घटक कारणीभूत असतात हे लक्षात घ्यायला पाहिजे.

५) छोटी राज्य आर्थिक दृष्टया सक्षम बनु शकतात का? तेलंगणाची घोषणा केल्यानंतर पुन्हा एकदा स्वतंत्र राज्याच्या मागणीस संजीवनी मिळाली आहे. अनेक राज्यातून स्वतंत्र राज्यांच्या मागण्या पुढे आलेल्या आहेत. महाराष्ट्रातून विदर्भ, गुजरातमधून

सौराष्ट्र, कर्नाटकातून कुर्ग, ओरिसामधून कोशलांचन, पश्चिम बंगालमधून गोरखालँड, उत्तर बिहार, उत्तर प्रदेशचा काही भाग आणि पश्चिम बंगालचा काही भाग मिळून मिथिलांचलची मागणी, उत्तरप्रदेशातून स्वतंत्र चार राज्यांच्या मागण्या आल्या आहेत. छोटी राज्य निर्माण केली तर त्या राज्यांची पुनर्रचना, प्रशासकीय यंत्रणा उभारणे, कायदा व सुव्यवस्थेसाठी खूप पैसा लागतो. हा पैसा कसा निर्माण करायचा हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्या त्या राज्याची आर्थिक शक्ती ही त्या राज्यातील नैसर्गिक साधन संपत्ती, औद्योगिक उत्पादन आणि उत्पन्न यावर अवलंबून आहे. ज्या राज्यांची अशी आर्थिक शक्ती फारच कमजोर आहे अशा राज्यांना आर्थिक मदतीसाठी केंद्राकडे मागणी करावी लागेल. भारतात बहुधा सर्वच राज्ये केंद्राच्या आर्थिक मदतीवर अवंलून आहेत. तसेच सध्याच्या आघांडयांच्या राजकारणात केंद्राकडून कसा न्याय मिळेल हाही एक प्रश्न निर्माण होतो. अशी आर्थिकदृष्टया कमजोर राज्य विकास कामे तीव्र गतीने करू शकत नाहीत. हे पूर्वेकडील राज्य झारखंड, उत्तराखंड, छत्तीसगड, यावरून सिध्द होते. थोडक्यात राज्ये आर्थिक संकटाचा सतत सामना करत आहेत असेही या अभ्यासावरून लक्षात येते.

६) जेवढे राज्य छोटे असेल अशा राज्यातील स्थानिक बहुसंख्यांक, प्रभुत्वशाली जाती, हितसंबधीगट, धर्माचा राजकारणावर प्रभाव पडून राजकारण अशा जाती-गटांच्या हिताभोवती फिरतांना दिसते. त्यांचाच प्रभाव राजकारणात, उदयोगात दिसतो. अशा राज्यात बहुसंख्यकांचा धोरणनिर्मितीवर प्रभाव पडून अल्संख्यांक गटाच्या हिताला, विकासाला दुर्लक्षिले जाण्याची दाट शक्यता असते. गोव्यात भंडारी, सारस्वत, बहुजन, ख्रिश्चन समाज यांचा प्रभाव आहे. मुख्यता भंडारी समाज ५० टक्के असल्याने त्यानांच राजकीय पक्ष जनाधांरासाठी प्राधान्य देतात. इतर अल्पसंख्यांक गटांकडे दुर्लक्षिले जाते. विदर्भात अनुसूचित जाती, जमाती आणि मागासवर्गीयांचा प्रभाव वाढू शकतो. कारण त्यांची संख्या तेथे आधिक आहे. हा मागास जमातींचा भाग स्वतंत्र राज्यात रूपांतरीत झाल्यास उर्वरित महाराष्ट्रात प्रभुत्वशाली मराठा समाजाचे वर्चस्व वाढण्याची संधी अपोआपच मिळते. तेलंगणा अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी आणि अल्पसंख्यांक मिळून ७० टक्के लोकसंख्या याच समाज गटातील आहे. (श्रीकृष्ण समितीच्या अहवालानुसार) त्यामुळे

समाजगटाचे राजकारण तेथील पक्ष करतील आणि त्यांचेच हितसंबध पाहिले जातील. इतर समाज गटाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. अशा छोटया राज्यावर भांडवली अर्थमुल्यांचा ही प्रभाव पडतो. बहुराष्ट्रीय कंपन्यांना आकाराने लहान असलेल्या आणि आर्थिकदृष्टया कमजोर असलेल्या राज्यातील सत्ताधींशांना त्यांच्या तालावर नाचवून आपल्याला अनुकूल धोरणे घेण्यास भाग पाडण्याला सोयीस्कर झालेला दिसतो.

७) मागास भूभागांसाठी संविधानात विशेष उपबंधाची व्यवस्था केली. पण त्यात गैरवापर, भ्रष्टाचार झाला म्हणून ती यशस्वी ठरली नाहीत. पहिल्या राज्यपुनर्रचना आयोगाने भाषावार प्रांरचना केल्यानंतर १९५६ ला संविधानात घटनादुरूस्ती करून जी राज्ये आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत रखडलेली आहेत. अशा राज्याच्या विकासासाठी विशेष लक्ष देण्यासाठी संविधानात भाग २१ मध्ये कलम ३७१ व त्या अंतर्गत असणारी पोटकलमाची व्यवस्था केलेली आहे. उदा. कलम ३७१- गुजरात व महाराष्ट्र, ३७१- क नागालँड, ३७१ ख- आसाम, ३७१ ग- मणिपूर, ३७१ घ- आंध्रप्रदेश, ३७१ च- सिक्किम, ३७१ छ- मिझोराम- ३७१ ज- अरूणाचल प्रदेश, ३७१ झ- गोवा इत्यादी. या राज्यांच्या या विशेष विकासासाठी केंद्र सरकार अतिरिक्त निधी देईल, त्याचे त्या राज्याच्या राज्यपालांच्या नियंत्रणाखाली, अधिकाराखाली विकासांच्या योजना राबविल्या जातील. राष्ट्रपतींच्या नियंत्रणाखाली राज्यांचे राज्यपाल कार्य करतील. राज्यपाल निधीचे समन्यायी पध्दतीने वाटप करतील आणि व्यावसायिक शिक्षणाच्या सोयी, रोजगारांच्या संधी, नोकरी आणि सरकारी क्षेत्रात संधी दिली जाईल. तसेच राज्यपाल विकासासाठी प्रादेशिक परिषदही निर्माण करू शकतो. त्यासंबंधिचे पूर्ण अधिकार राज्यपालांना असतात. राज्यपाल प्रतिवर्षी कार्याचा अहवाल राष्ट्रपतीकडे पाठवितो. मागास भुभागासाठी जी संविधानात्मक व्यवस्था केलेली आहे. त्यात वैधानिक विकास मंडळे, विकासांचे विशेष निधीचे पॅकेज, प्रादेशिक मंडळे ही म्हणजे तेवढे यशस्वी झालेली नहीत. कारण पक्षीय स्वार्थी हितसंबंधाच्या राजकारणामुळे या योजना कोलमडल्या आहेत. त्यातला पैशाचा वाढता अपव्यय, भ्रष्टाचाराची वाढती प्रकरणे वाढली आहेत. गुरखालँडच्या विकासासाठी सरकारने ‘गोरखा हिल डेव्हलपमेंट काऊन्सिल’ स्थापन केली पण त्यानंतर या कॉऊन्सिलमधील नेत्यांची

भ्रष्टाचारांची प्रकरणे उघडकीस आली. अर्थात हा विशेष दिलेला निधी कर्मचारी आणि नेत्यांच्या खिशात जातो आणि जनता त्याच ठिकाणी राहते हे सिध्द झालेले आहे.

केंद्र सरकारने बुंदेलखंडच्या विकासासाठी ७२६६ कोटी रूपयाचे पॅकेज दिले. या पॅकेजद्वारे जलसिंचन, शेती सुधारणा, पर्यावरण, पशुपालन, नवीन विहीर, तलाव खोदणे इत्यादींसाठी खर्च करणे अपेक्षित होते. मात्र या पॅकेजचा विकासासाठी काहीही फायदा झालेला नाही. बुंदेलखंडची स्थिती जैसे थे आहे. शेतकऱ्याच्या आत्महत्त्या चालूच आहेत. पैसे हे नेते व कंत्राटदारांच्या खिशात चाललेले आहेत. त्यामुळे विकास योजना कागदावरच आहेत. कंत्राट हे गैर मार्गांनी दिली जातात. स्थानिक आमदारांनी कंत्राट ही आपल्या कंत्राटदार पार्टनरला दिलेली आहेत. केंद्रीय ग्रामीण विकास राज्यमंत्री प्रदिप जैन आदित्य ने बुंदेलखंड पॅकेज अयशस्वी झाल्याचे मुख्य कारण पॅकेजचा गैरवापर आणि नेते कंत्राटदारांचा वाढता भ्रष्टाचार यामुळे यशस्वी झालेले नाही असे सांगितले.

राज्याचे विभाजन केले तर ते अस्मितांचे राजकारण वाढू शकते. ही राजकारण्याच्या आकांक्षेचे केंद्र बनतात, असे विभाजन अनेक नव्या वादाला जन्म देवू शकतात. त्यामुळे नवे राज्य निर्माण करण्यापेक्षा स्थानिक स्तरावर पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी सत्तेचे जास्तीत जास्त विकेंद्रीकरण करणे गरजेचे आहे. त्याबरोबरच वैधानिक विकास मंडळाच्या अंमलबजावणीतील त्रुटी कमी करून मजबूत करणे, विशेष आर्थिक तरतूद करणे. कार्यक्षमता कशी वाढवता येईल. भ्रष्टाचार कसा कमी करता येईल. विकास योजनांना तीव्र गती कशी मिळेल हे पाहणे महत्त्वाचे ठरते. तसेच स्थानिक समस्या, गरजानुसार प्रशासकीय यंत्रणा लवचिक करणे गरजेचे आहे असे झाले तर विकासासाठी स्वतंत्र राज्यांची गरज भासणार नाही असे या अभ्यासावरून म्हणावेसे वाटते.

# संदर्भ सूची

## मराठी संदर्भ

### (१) पुस्तके :-


१. पळशीकर सुहास, मे २००९, भारताच्या राजकरणाचा ताळेबंद, मराठी वाचन साहित्य मालिका क्र.१, प्रगत अध्ययन केंद्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग पुणे, विद्यापीठ पुणे.

२. जाधव तुकाराम/शिरापूरकर महेश, जानेवारी २०११, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया खंड-१, द युनिक ॲकडमी पुणे.

३. दिवान मोहन, देवधर जयंत, दिवाण विवेक, २ डिसेंबर २००४, भारतातील राज्यांचे राजकारण, विद्या प्रकाशन,नागपूर.

४. बिपनचंद्र, २००४, इंडिया ऑफ्टर इंडिपेंडन्स, भाषावर प्रांतरचना, के सागर प्रकाशन, पुणे.

५. वासनिक अनिल, १४ ऑक्टो. २०१०, विदर्भ राज्य वास्तव आणि विपर्यास, श्री विद्या प्रकाशन, नागपूर.

६. किंमतकर मधुकर, डिसेंबर २०११, लोकराज्य विशेषांक(विदर्भ)अनुशेषाची सध्यस्थिती, महाराष्ट्र शासन, मुंबई.

७. खांदेवाले श्रीनिवास, २०१२, विदर्भ राज्य संकल्पना, विद्या बुक्स, नागपूर.

८. जोशी श्रीपाद भालचंद्र, ४ जाने २०१३, वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र? एका वादाची सद्यास्थिती, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

९. कुलकर्णी सुहास, चांपानेरकर मिलिंद, २६ फेब्रुवारी २०१३, असा घडला भारत, विदर्भ प्रश्न व नागपूर करार, रोहन प्रकाशन, पुणे.

१०. कडूकर हेमंत, २००६, विदर्भाचे मागासलेपण: विदर्भ वैधानिक विकास मंडळाची भूमिका, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, एम.फिल (अप्रकाशित) प्रबंध.

११. फडके य.दि., १८ जून २००७ विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड सातवा, स.म.चळवळ (१९४८ ते १९६०), मौज प्रकाशन, पुणे.

१२. जाधव तुकाराम, २०१३-१४, महाराष्ट्र वार्षिकी, स्वतंत्र विदर्भ राज्याची चळवळ, द युनिक ॲकडमी, पुणे.

१३. लाव्हात्रे बबन, ६ डिसेंबर २०१२, विदर्भ राज्याचे खच्चीकरण, प्रबुध्द प्रकाशन, नागपूर.

१४. कांबळे बाळ, वकील अलीम, देवरे पी. डी., २०१३, भारतीय राज्यघटना, राजकारण व कायदा, डांयमंड प्रकाशन, पुणे.

**(२) मासिकेः-**

१. चोले माधव, मे २०१२, छोटया राज्यनिर्मितीचे वाढते बहूआयामी पेच, नवभारत, प्रज्ञापाठशाला मंडळ वाई संचलित मासिक.

२. चव्हाण अभिषेक देवराव, डिसेंबर २०१०, ईशान्य भारतातील फुटिरतेच्या चळवळीचे अध्ययन, योजना विशेषांक, मुंबई.

३. भट्टाचार्य जे.बी., २० ऑगस्ट २०११, ईशान्य, भारतातील बंडखोरी,(मुळ कारणांचा शोध) साप्ताहिक साधना ६३ वा वर्धापन दिन विशेषांक, पुणे.

४. द्वादशीवार सुरेश, १४ ऑगस्ट २०१०, तर विदर्भाने महाराष्ट्रासोबत राहायचे कशाला? साप्ताहिक साधना विशेषांक, पुणे,

५. किंमतकर मधुकर, १४ ऑगस्ट २०१०, भविष्यातील विकासाकरिता वेगळया विदर्भ राज्याशिवाय अन्य पर्याय नाही, विदर्भाला सुखी करा, साप्ताहिक साधना विशेषांक, पुणे.

६. महाजन रत्नाकर, ‘विदर्भ राज्य हे मृगजळ आहे त्या मागे धावू नका’ साप्ताहिक साधना विशेषांक, १४ ऑगस्ट २०१०, पुणे.

७. ‘तेलंगना भारत का २९ वा राज्य’ लेख, सप्टेंबर २०१३, क्रॉनिकल मासिक.

८.	धनागरे द.ना., स्वतंत्र विदर्भ राज्य ध्यास, विचार आणि चळवळ, जुलै २०११, नवभारत, सातारा.

९.	पवार दिपाली, ११ फेब्रुवारी २०११, वेगळा विदर्भः वैदर्भीय समाजाची गरज, स्मरणिका, वर्धा.

१०.	देसाई हेमंत, सप्टेंबर २०१३, तेलंगणाची मुक्ती, सत्याग्रही विचारधारा, पुणे.


## (३) मराठी वृत्तपत्रेः-


१. सकाळ न्यूज नेटवर्क, ३१ जुलै २०१३, पृष्ठ १

२. महाराष्ट्र टाईम्स, ०५.०८.२०१३ औरंगाबाद.

३. दै.सकाळ, २४ ऑगस्ट २०१३, औरंगाबाद.

४. लोकसत्ता, १९ ऑगस्ट २०१३, मुंबई.

५. महाराष्ट्र टाईम्स, ५ ऑक्टोंबर २०१३, पी.टी.आय.नवी दिल्ली.

६. सकाळ, ६ ऑक्टोंबर २०१३ मुंबई, पृष्ठ २

७. सकाळ, ११ ऑक्टोंबर २०१३ नवी दिल्ली/हैद्राबाद, पृष्ठ २

८. कांबळे बाळ, विदर्भ म्हणेल जय महाराष्ट्र, सकाळ, २३ नोव्हेंबर २०१३, पृष्ठ५

९. कांबळे बाळ, छोटया राज्यांचे ‘उत्तर’प्रश्न वाढवेल, सकाळ, २३ नोव्हेंबर २०११, पृष्ठ ५

१०. दै.लोकमत, देशौन्नती, २१ जानेवारी २०१० नागपूर.

११. धोटे जांबुवतराव, स्वतंत्र विदर्भाचे आंदोलन आता पुरे झाले, लोकसत्ता, २६ मार्च २०१३

१२. महाराष्ट्र टाईम्स, १ ऑगस्ट २०१३

१३. लोकसत्ता, ५ ऑगस्ट २०१३, मुंबई आवृत्ती.

१४. लोकसत्ता, १ ऑगस्ट २०१३, मुंबई आवृत्ती.

१५. सकाळ वृत्तसेवा, १ ऑगस्ट २०१३, नागपूर.

१६. लोकसत्ता, ६ ऑगस्ट २०१३, मुंबई आवृत्ती.

१७. लोकसत्ता, ७ ऑगस्ट २०१३, औरंगाबाद आवृत्ती..

18. महाराष्ट्र टाईम्स, २४ ऑगस्ट २०१३, मुंबई.

19. लोकसत्ता, २४ ऑगस्ट २०१३, नागपूर.

20. हरकरे विक्रम, १३ ऑगस्ट २०१३, निर्णायकी विदर्भ, लोकसत्ता.

२१. दै.सकाळ, २९ सप्टेंबर २०१३

२२. लोकसत्ता, ३० सप्टेंबर २०१३

२३. प्रधान संतोष, ‘विदर्भाची राजकीय पोळी’ लोकसत्ता, ६ ऑगस्ट २०१३

## इंग्रजी संदर्भ

### (१) पुस्तके:-


1. Ambedkar B.R., 1955, Thoughts on Linguistic States, Granthali, Mumbai.
2. Reddy Arutla Ramchandra 1984, Telangana Struggle Memories, People's Publishing House, New Delhi.
3. Sanghatana, Shree Shakti, 1989, We were making History : Life Stories of Women in the Telegana People`s, St.Martin`s Press, New Delhi. (ISBN 0862326796)


### (२) वृत्तपत्रे:-


1. Front Page: Sushuma Pitches or Telangana, The Hindu, 24.1.2010
2. Controversy over SRCblows over Andhra Pradesh, The Hindu 5/3/2004
3. Telangana student wing leader arrested, The Times of India, 29 November 2011.
4. Transport employees strike paralyes Telangana, The Time of India, 19 September 2011.
5. Railway station turns battleground, India Express, 17 October 2011.
6. Telangana: TRS wants more talks with Congress, The Times of India, 4-10-12
7. Telangana Million March banned by government will take place, Vow Activists, 27 Sept.2012
8 Telangana groups, government heading for confronation over march, Indian Express, 13 March 2013.
9 Hyderabad unde siege; shutdown today, Times of India, 14 June 2013.
10 Telangana agitation returns to centre stage, The Hindu, 14 June 2013.
11. Telangana anytime now, say Congress leaders. The Hindu, 1 July 2013.
12. Congress Leaders Damands Formation of Telangana, Outlook; 1 July 2013.
13. Decision on Telangana issue in final stage: Digvijaya, Times of India, 7 July 2013.
14. Telegana March in Hyderabad, Indian Express, 1st October 2012.

## रिपोर्टस्ः-


1. SRC Submits report.
2. Srikrishna Committee Report.
3. Fact Finding Team on Vidharbha, Planning Commission, Govt. of India.


## वेबसाईटस्ः-


1. "Andhra Pradesh News:JACurgesYSR to implement Go 610". Chennal, India: The Hindu 2004-05-25. http://www.hindu.com.2004/05/25stories/2004052503490500.htm.
2. "Page 4070 pg SKC report". (PDF). http://pib.nic.in/archive/others/2011/jan/d2011010502.pdf. 2011-10-09.
3. "Telangana Development forum-USA". Telangana org.http://www.telangana.org/Papers.asp. 2010-09-04
4. "Telangana tantrum". Hinduonnet.com. http://ww.hinduonnet. Com/fine/f12318/stories/20060922003303400.htm. 2010-09-14.
5. "Amin jafri, Syed(2001-05-17).Massive rally demands Telangana state".rediff.com.http;//ia.regiff.com.
6. "Common Minimum Programme of the congress led United Progressive Alliance". Indian National Congress. May 2004. Archived from the original 07 2007-12-12.http://web.archive.org./web/200712120848468.
7. "TRS withdraws support to UPA govt". rediff.com. 2006-09-23. http://ia.rediff.com/news/2006/sep/23trs1.him. 2008-02-16.
8. http://www.deccanchronicle. Com/Hyderabad-news/million-march-intensifies-in-hyderabad-statues-on-tank-bund-damaged-3283#tabs.

# University of Pune

Pune: - 411 007

## Board of Colleges and University Development

Ref. No:- OSD /BCUD/230/122 Date:- 14/05/2012

To,
The Principal,
Rayat Shikshan Sanstha Dada Patil College
Addr: Karjat Ahmednagar Ta: Karjat Dist: Ahmednagar

**Subject:-** Sanction BCUD research Proposals for 2012-13 to 2013-14.

Dear Sir /Madam,

With reference to the acceptance letter and revised budget of the Research Proposal received from Principle Investigator, the University authorities are pleased to approve the project submitted by the following Principle Investigator along with the sanctioned amount show against their names for year 2012-13 to 2013-14.

| Sr. No. | Full Name | Sanction Amount |
|---|---|---|
| 1 | Bal Anant Kamble | 1,60,000/- |
| | **Total** | **1,60,000/-** |

The 1st Installment (50% of the sanctioned amount) of the Sanction research project has been released. You are requested to inform concerned teacher.

**Details about the Norms and Guidelines can be download from www.unipune.ac.in**

Dr. Ravindra G. Jaybhaye
OSD/BCUD

Dr. W. N. Gade
Director, BCUD